
# B.Aadhar

ISSUE No- (CCLXIX) 281





**Chief Editor**
**Prof. Virag S. Gawande**
**Director**
**Aadhar Social**
**Research & Development**
**Training Institute Amravati**

**Editor:**
**Dr.Dinesh W.Nichit**
**Principal**
**Sant Gadge Maharaj**
**Art's Comm,Sci Collage,**
**Walgaon.Dist. Amravati.**

**Executive Editor:**
**Dr.Sanjay J. Kothari**
**Head, Deptt. of Economics,**
**G.S.Tompe Arts Comm,Sci Collage**
**Chandur Bazar Dist. Amravati.**

PRINCIPAL
Shivaji College, HIN

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit to :

| | | |
|---|---|---|
| 22 | A Feminist Disability Study of Flannery O'Connor's 'Good Country People' **Dhrumi Shah** | 88 |
| 23 | Impact Of Covid-19 On Enviornment **Shri. Shankar G. Bonde** | 92 |
| 24 | **Politics of Punjab A Historical Perspective** **Sudhi Gandhi /Dr.Neelam Sharma** | 102 |
| 25 | Effect of Improved Marketing Strategies of TurDal Millers on New Market Location and Expansion in Existing Market Potentials in Nagpur District **Dr. Tarunya Hannupuri Multani** | 106 |
| 26 | डॉ. दामोदर खड़से की अनूदित कृतियों में आए 'पुनरूक्त शब्द' **डॉ. सुनील रामलाल मावस्कर** | 115 |
| 27 | नागपूर शहर का भूमि उपयोग **प्रा. रवि आर. साखरे** | 119 |
| 28 | ग्रामीण महिलाओं के आर्थिक स्थिती का अध्ययन **प्रा.डॉ. ए.बी. पटले** | 125 |
| 29 | विश्व कल्याणकारी संस्कृत भाषा **डॉ सत्येंद्र संगाप्पा राऊत** | 131 |
| 30 | प्रेम और सौंदर्य के कवि "प्रसाद" **प्रा.डॉ. उमावती मोहनचंद्र पवार** | 135 |
| 31 | तपोवन कें आंगन में शब्दों की संवेदना: गुरु जाम्भोजी **डॉ. प्रा. शालिनी ब. वाटाणे** | 143 |
| 32 | 'दौड' उपन्यासमें चित्रित परिवर्तित जीवनमूल्य **डॉ. प्रमोद परदेशी** | 147 |
| 33 | डॉ. नरेंद्र दाभोळकरांचा बुध्दिप्रामाण्यवाद **पंडित ल. काळे** | 152 |
| 34 | अमरावती जिह्याचा सामाजिक व राजकीय इतिहास **प्रा. डॉ. देवलाल सुखदेवराव आठवले** | 155 |
| 35 | पाणी व्यवस्थापनातस्त्रीयांचे योगदान **प्रा. डॉ. लोकचंद बी. जाधव** | 167 |
| 36 | पाश्चात्य शिक्षणाचा भारतीय समाजावरील प्रभाव **डॉ.विजय रामदास तिरपुडे** | 171 |
| 37 | आर्य अष्टांगिक मार्गातील सम्यक अजीविकेचे महत्त्व **प्रा. डॉ. बंडू एस. मानवटकर** | 174 |
| 38 | संत ज्ञानेवश्वरांच्या समग्र वाङ्मयाचा अभ्यास 'गौळणी आणि विराण्या **प्रा. रमेश म. धोटे** | 177 |
| 39 | आपत्ती व्यवस्थापनाचे महत्त्व एक प्रशासकीय अभ्यास: **डॉ. बाजीराव चंद्रकांतराव वडवळे** | 180 |
| 40 | ठाकर आदिवासी जमातीचे सामाजिक जीवन **डॉ.एन.आर. हुरगुळे** | 183 |
| 41 | Mental &Social health- Not a destination, but a process **Dr.Suvarna Gorakshanath Shikare** | 186 |
| 42 | Reaction Kinetics With 1-Chlorobenzotriazole As A Versatile Oxidant Compound: A Review **Hullara Vinaoda** | 190 |




34

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ( (SJIF) -7.675, Issue NO, 281 (CCLXXXI) A
ISSN : 2278-9308
March, 2021

# ठाकर आदिवासी जमातीचे सामाजिक जीवन

**डॉ.एन.आर. हुरगूळे**
समाजशास्त्र विभागप्रमुख शिवाजी महाविद्यालय,हिंगोली
मो : ९८८१९४१३२९ Email : hurgulenr२२२@gmail.com

**प्रस्तावना**

महाराष्ट्रातील सह्याद्री पर्वताच्या प्रदेशात ठाणे, पुणे, नाशिक, अहमदनगर, रायगड, सिंधुदुर्ग, सातारा या जिल्ह्यामध्ये वारली, कातकरी, ठाकर, कोकणी, महादेव, कोळी, मल्हार कोळी इ. जमातीचे लोक राहतात. 'ज्ञानकोष' मराठी विश्वकोषानुसार 'ठाकूर' नावाचे लोक मुंबई प्रांत, पंजाब व काश्मिर प्रांतात राहतात. इतिहासाचार्य राजवाड्यांनी "ठाकुर" हा शब्द "तस्कर" या शब्दापासून तयार झाला आहे. तस्कर, ठाकर, ठक्कर, ठाकूर तस्कर याचा अर्थ चोर होतो. त्यामुळे गुन्हेगारी जमातीचा अर्थ लागतो. परंतू तस्कर हे नाव देणे उचीत वाटत नाही. कारण कष्ट करुन व वेळप्रसंगी भिक्षा मागून उपजिविका करणारी ही जमात आहे. चोरी लबाडी हा त्यांचा गुणधर्म नाही. मुक्या प्राण्यावर वनस्पतीवर प्रेम करणारी ही जमात आहे.[१]

**उद्दिष्टे :**

१. ठाकर जमातीचे सामाजिक जीवन जाणून घेणे.
२. ठाकर जमातीच्या सामाजिक स्थितीतील बदलांचा अभ्यास करणे.

**गृहितके :**

१. ठाकर जमातीची हिंदू व इतर धर्मीयापेक्षा एक वेगळी व वैशिष्ठयपुर्ण जीवनशैली आहे
२. स्वातंत्र्योत्तर काळात मोठ्या प्रमाणात प्रगत समाजाशी संपर्क आल्याने या ठाकर जमातीमधील कुटूंबसंस्थेत बदल होत आहेत

**ठाकर जमातीचे सामाजिक जीवन**

महाराष्ट्रात अनेक आदिवासी जमाती आहेत. महाराष्ट्रात असणाऱ्या या प्रत्येक आदिवासी जमातीचे सामाजिक जीवन, आर्थिक जीवन, सांस्कृतिक जीवन सारखे आढळत नाही. प्रत्येक जमातीचे सामाजिक जीवन त्यांच्या सभोवतालच्या भौगोलिक, आर्थिक, आणि पारंपारिक चालत आलेल्या आणि रुढ झालेल्या जीवन सृष्टीने बनवलेले आहे. ठाकर ही आदिवासी जमात भारतात फक्त महाराष्ट्र राज्यात आढळते. शिवाय या जमातीची वस्ती राज्यभर विखुरलेली नाही. ही जमात प्रामुख्याने सह्याद्री पर्वताच्या पूर्व-पश्चिम उतारावर ठाणे, पुणे, अहमदनगर, नाशिक व रायगड जिल्ह्यांच्या डोंगराळ व पठारी पट्ट्यात व अजिंठा पर्वताच्या रांगात आढळते. ठाकर आदिवासी जमातीची जीवनशैली इतर आदिवासी जमातीपेक्षा आगळी-वेगळी आहे. ह्या समाजातील लोक हे भोळे, भाबडे, अबोल, निरागस प्रामाणिक, दैववादी परंपरागत निसर्गाच्या सानिध्यात राहून निसर्गावर प्रेम करणारे आहेत. ते वनवासी असले तरी त्यांची राहणी त्यांच्या निर्मळ अंत:करणाप्रमाणे साधी व स्वच्छ असते. त्यांच्यातील आत्मीयता व सचोटी हे गुण लक्षात घेण्यासारखे आहेत. साधी राहणी, थोड्या गरजा, मर्यादीत महत्वाकांक्षा आहेत. रुढी, प्रथा, परंपरा, विधी, नातेवाईक, गावकरी ह्यांचा त्यांच्या जीवनावर विशेष प्रभाव दिसून येतो. त्याच्या जीवनामध्ये पैसा, संपत्तीला मर्यादीत स्थान आहे. जमीन, गुरेढोरे, बकऱ्या, कोंबड्या, मासे, खेकडे, व श्रम करण्यासाठी मजबूत हात पाय हीच त्यांची संपत्ती आहे.[२]

**१. कौटुंबिक जीवन**

ठाकर जमातीची संस्कृती ही पुरुषप्रधान आहे. घरातील व समाजातील सर्व निर्णय हे घरातील वडीलधारी पुरुष मंडळी घेते. काही प्रसंगी घरातील स्त्रीयांशी ते निर्णयासंबंधी सल्ला मसलत करतात. परंतू त्यांचा मनाला समाजात फारशी किंमत राहत नाही. या जमातीतील कौटुंबिक वातावरण फार किचकट किंवा कटकटीचे नसते. कारण घरातील प्रत्येक व्यक्ती जमेल तसे काम करुन कमावती असते. गरजा कमी असतात नैतिक बंधने ताठर राहत नाहीत. त्यामुळे आर्थिक संकट, विवंचना फारशी नसते. ठाकर जमातीत एकत्रित कुटूंब पध्दती अस्तित्वात नाही. आई वडील मुलांचे लग्न झाले की, स्वतंत्र राहणे पसंद करतात. वेळप्रसंगी मुलांकडून मदत घेतात. जास्त मुले असतील तर आळीपाळीनी त्यांच्याकडे काही दिवस राहतात. परंतू एकत्र राहणाऱ्यांचे प्रभाव फार कमी दिसून येते. ठाकर कुटूंब विभक्त कुटूंब असुन ठाकर कुटूंबात कुटूंबप्रमुख म्हणून वडील काम करतात. परंतू तो त्यांच्या पत्नीच्या इच्छेचा अनादर करत नाही. कारण तीच सर्व घर सांभाळते. प्रौढ किंवा लहान मुलांना कुटुंबासंबंधी बोलण्याचा अधिकार नसतो. परंतू मुले ही कुटूंबांचा महत्वाचा भाग असतात. एखाद्या व्यक्तीला किती मुले आहेत. यावरुन त्यांचे समाजातील स्थान ठरत असते. एखादा पाहुणा घरी आला तर तो तुमच्याकडे मालमत्ता किती आहे हे न विचारता तुम्हाला मुले किती आहेत असे विचारतो. ठाकर कुटूंबात हिंदु धर्मातील अनेक परंपरा चालीरीती पाळल्या जात नाहीत. कुटुंबातील वडीलधाऱ्या व्यक्तिला ही एकेरी नावाने हाक मारतात. वडीलांच्या समोर ही मुलगा आपल्या पत्नीला मोकळेपणाने बोलू शकतो. कुटुंबात सर्वांना एकत्र जेवले पाहिजे असा नियम नाही. प्रत्येकजण आपल्या सोयीप्रमाणे जेवतो. दुसऱ्यासाठी थांबण्याची

52



35

**B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal**
Impact Factor - ( (SJIF) -7.675, Issue NO, 281 (CCLXXXI) A
ISSN : 2278-9308
March, 2021

आवश्यकता नसते. पण स्त्रीया पुरुष जेवल्यानंतर जेवण करतात.[३] यावरुन हे स्पष्ट होते की, ठाकर जमातीची एक वेगळी व वैशिष्ठ्यपुर्ण जीवनशैली आहे.

**२. घराचे स्वरुप**

ठाकर हे माळपठारावर दऱ्याखोऱ्यात शहरापासून दूर वस्ती करुन राहतात. ठाकर जमातीच्या वस्त्यांना "वाडी", "वस्ती", "पाडा", या नावाने ओळखतात. उदा. नाग्याची वाडी, पसारवाडी, आवळ्याची वाडी इत्यादी. वस्त्याची, वाड्यांची नावे वनस्पती व प्राण्यांच्या नावावरुन पडलेली असतात. ठाकरवाडीत निव्वळ ठाकरांचीच वस्ती असते. त्याठिकाणी इतर दुसऱ्याची झ ोपडी असत नाही. ठाकरांची घरे म्हणजे त्यांच्या झोपड्या कुडाच्या व कच्च्या मातीच्या किंवा दगडाच्या भिंती असणारी असते. छताचा भाग हा लाकडे (वासे) व त्यावर गवत अंथरुण तयार केलेला असतो. या झोपडीची लांबी दहा फुटांपासून ५० फुटांपर्यंत असते तर रुंदी मात्र दहा ते पंधरा फुटांपर्यंत असते. स्वयंपाकाची जागा झोपडीच्या एका टोकाला असते. हेच त्यांचे स्वयंपाकघर असते. ही झोपडी / घरे सुरक्षितता किंवा मजबुती यापेक्षा ऊन, वारा, पाऊस यांपासून संरक्षण करणारी असते. झोपड्यांचा आकार जरुरीप्रमाणे व ऐपतीप्रमाणे लहानमोठा असतो. लहान झोपडीला एकच दरवाजा असतो. तर मोठ्या झोपड्यांना दोन दरवाजे असतात. ठाकरांच्या झोपड्या एकसारख्या आढळतात. वस्तीच्या मध्यभागी होळी पेटविणे, नाचगाणी करणे, सायंकाळी एकत्र जमणे यासाठी मोकळी जागा आढळते. बहुतांश झोपडीची दारे ही पूर्वेकडे आढळतात. प्रत्येक घरासमोर गुरे बांधण्यासाठी समोरच्या भागात दुसरी झोपडी असते.[४]

ठाकर जमातीतील लोकांचा घर रचनेत बद्दल झालेला असून नागरी भागातील लोकाप्रमाणे काही कुटूंबानी घरामध्ये सर्व सोयी सुविधा केलेल्या आहेत. यामुळे त्यांची घरे व राहणीमानाच्या दर्जा सुधारलेला दिसून येतो.

**३. ठाकर जमातीचे जीवनचक्र**

मानव प्राण्याला चौऱ्याऐंशी लक्ष योनीतून फिरावे लागते हे हिंदु तत्वज्ञान ठाकर जमातीत मान्य आहे. ठाकर लोक जी कुळी वाचतात. त्यात वांझीची कुळी आहे. वांझ म्हणजे निपुत्रीक बाई. तिला कोणकोणत्या जन्मातून जावे लागते. हे त्या कुळीत ठाकर कलाकारांनी स्पष्ट केलेले आहे.[५]

**४. ठाकर जमातीतील पोषाख व जीवनशैली**

आदिवासीचा पेहराव अगदी साधा असतो. कमरेला लंगोटी किंवा गुढघ्यापर्यंत लावलेला धोतराचा काच्या, अंगात कोपरी किंवा पेहरण असा असतो. स्त्रियांचा पेहराव प्रत्येक जमातीमध्ये वेगवेगळा असतो. कोकणा, महादेव कोळी, ठाकर जमातीच्या स्त्रीया डोक्यावर फडकी नावाचे वस्त्र घेतात. हे वस्त्र लाल रंगाचे असते. त्यावर डिजाईन केलेले असते. भिल्ल जमातीमधील स्त्रीया ह्या नऊवारी लुगड्याचे दोन तुकडे करतात. एक तुकडा नेसतात व दूसरा तुकडा डोक्यावर घेतात. ठाकूर, कातकरी, भिल्ल या जमातीच्या स्त्रीयांच्या पेहरावात भिन्नता आहे. दागदागिने वेगवेगळी आहोत.[६]

**५. शरीररचना आणि पोशाख**

सह्याद्रीच्या कुशीत वाढलेल्या ठाकर लोकांची शरीरयष्टी दणकट असते. सर्वसाधारणपणे ठाकर स्त्री-पुरुषांचे केस कुरळे, ओठ मोठे व जाड, तर डोळे काळेभोर असतात. ठाकर लोक रंगाने काळेसावळे, मध्यम उंचीचे व शरीराने सडपातळ पण काटक आणि मेहनती असतात. शरीराचा तोल जाईल असा एकही माणूस ठाकर जमातीत दिसत नाही. पोट खपाटीला गेलेली म्हातारी माणसे मात्र ठाकर समाजात बरीच दिसतात.[७]

**६. ठाकर लोकांचा आहार**

ठाकर लोक बहुधा दिवसातून तीन वेळा जेवण करतात. जेवणामध्ये तांदूळाची भाकर, भात, नागली, वरई, वाल, तूर, उडीद, चवळी इ. अन्नधान्याचा वापर केला जातो. खोरासनी या नावाने ओळखल्या जाणारी तिळाची चटणी ठाकर लोक आवडीने खातात. कालवणाला घट्टपणा आणण्यासाठी ते त्याला तांदळाचे पीठ लावतात. कालवणाऐवजी ते कित्येकवेळा, चिंच, कोकम, किंवा करवंदाचे सारही वापरतात.[८]

**७. ठाकर जमातीतील विवाह पध्दत**

ठाकर जमातीत बहुतेक प्रमाणात एकविवाह आढळतो व काही कारणांमुळे प्रथम पत्नीला मूल न झाल्यास बहुविवाहाची प्रथा आहे. ठाकर जमातीत अंतर्विवाह व बहिर्विवाहाचे नियम पाळले जातात. अधिमान्य विवाह (आते-मामे भावंडाचा विवाह, मेहुणा-मेहुणी विवाह) ठाकर समाजात आढळतात. त्याचप्रमाणे आदिवासी समाजात जोडीदार निवडीचे जे आठ मार्ग आहेत, त्यापैकी दोन मार्ग म्हणजे क्रय विवाह व घरघुशी विवाह प्रामुख्याने ठाकर जमातीत आढळतात.[९]

**८. ठाकर समाजातील जात पंचायत**

ठाकरांच्या सामाजिक जीवनात पाटलाचा मान मोठा असतो. पाटलाला 'पाडेखोत' असे म्हणतात. त्याचा हा हुद्दा सरकारमान्य नसून लोकमान्य असतो. गावच्या पाटलाला समाजात मानपान व धार्मिक विधीचे अधिकार असतात. लग्नविधी, होळीपूजन, दसरा, भोंडाईची पूजा, पाटलाला विचारुन सुरु करावी लागते. ठाकर समाजाचे न्याय मिळविण्याचे एकमेव साधन म्हणजे पंचायत होय.काडीमोड, मयताच्या मालमत्तेत वाटप, अनैतिक लैंगिक संबंध हीच मुख्यत: पंचायतीची कार्यक्षेत्र असतात. या गुन्ह्यासाठी पंचायतीच्या नियमानुसार ठरलेले दंड द्यावेच लागतात. हा दंड जास्तीत जास्त उकळण्याचा प्रयत्न जात पंचायतीकडून केला जातो. स्त्रिया बहुधा पंचायतीला हजर राहत नाहीत. परंतु ज्यावेळी स्त्रियांच्या अनैतिक संबंधाचा विचार करण्यासाठी पंचायत भरते, त्यावेळी प्रौढ स्त्रिया उपस्थित राहतात व चर्चेत भाग घेतात. वाळीत टाकणे ही पंचायतीची सर्वात मोठी



38

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal | ISSN : 2278-9308
Impact Factor - ( (SJIF) -7.675, Issue NO, 281 (CCLXXXI) A | March, 2021

शिक्षा असते. व दंड स्वरुपात जमा झालेल्या रकमेचा उपयोग गावातील उत्सव व इतर कारणासाठी केला जातो. ठाकर जमातीची संघटना कडक आहे.[१०]

- **ठाकर जमातीच्या सामाजिक स्थितीतील बदल**

स्वातंत्र्योत्तर काळात मोठ्या प्रमाणात प्रगत समाजाशी संपर्क आल्याने या ठाकर जमातीमधील कुटूंबसंस्थेत बदल होत आहेत. त्यांच्यातील संयूक्त कुटूंबपध्दती हळूहळू नष्ट होऊन विभक्त कुटूंब पध्दतीचा स्विकार केला जात आहे. नोकरी, व्यवसाय किंवा मजूरी करण्यासाठी ठाकर जमातीमधील अनेक व्यक्ती शहराकडे किंवा औद्योगिक क्षेत्राकडे धाव घेत असल्याने. विभक्त व लहान कुटूंब असण्याला प्राधान्य दिले जात आहे. आदिवासी जमातीलमधील शिक्षणामुळे त्यांच्यात वेगाने कौटुंबिक बदल होत आहेत. जमातीचा बाह्य समाजाशी आलेल्या संपर्कामुळे विवाहसंस्थेमध्ये सकारात्मक व नकारात्मक परिवर्तन झाले आहे. प्रगत समाजाच्या संपर्कामुळे विवाह मुहर्त, विवाह विधी याचा शिरकाव झाला आहे. यामूळे आदिवासी जमातीमधील परंपरागत कौटूंबिक जीवन पध्दतीला तडे जात आहेत. हिंदू धर्मातील अनेक धार्मिक विधी, पुजा-अर्चा, सण-समारंभ, देव-देवतांची पूजा आदिवासीमध्ये सुरु झाली. नवीन शिकलेल्या आदिवासी तरुणांच्या पिढीचे जीवन पध्दतीत अमुलाग्र परिवर्तन झाले आहे. ठाकर जमात शैक्षणिक दृष्ट्या मागास आहे. त्यामुळे स्वातंत्र्योत्तर काळात विविध शासकीय उपाययोजनेव्दारे त्यांच्या विकासाचे प्रयत्न होत आहेत. शैक्षणिक विकासासाठी आरक्षण, शैक्षणिक सवलती देऊन शैक्षणिक विकासाचे प्रयत्न केले आहेत. यामुळे साक्षरतेचे प्रमाण वाढले आहे. आदिवासीची मुले शाळेत जात आहेत. नीटनेटकी कपडे घालत आहेत. शिक्षणामध्ये आवड निर्माण होउ लागली. आदिवासी जमातीमधील अनेक तरुण उच्चपदस्थ अधिकारी म्हणून कार्य करीत आहेत. तर काही डॉक्टर, इंजिनिअर, वकील, प्राध्यापक, शिक्षणक, पोलीस म्हणून कार्य करीत आहेत.[११] याचा परिणाम ठाकर आदिवासी जमातीत स्तरीकरण निर्माण झाले आहे.

ठाकर आदिवासी जमातीचा आर्थिक विकास करण्यासाठी शासनाने अनेक विभागाव्दारे आर्थिक सुधार कार्यक्रम राबवून अनेक योजना सुरु केल्या आहेत. यामुळे आदिवासी जमातीमध्ये स्थानांतरीत शेती ऐवजी स्थिर शेती, पशुपालन, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, बकरीपालन, वराहपालन, अशी पुरक व्यवसायाला महत्व दिले जात आहे. परंपरागत व्यवसाय पध्दतीत बदल करुन हे नवे बदल त्यांनी स्विकारले आहेत. नवीन पिढीतील आदिवासी तरुण शहरात संगणक इन्स्टिट्युटमध्ये काम करीत आहेत. नवनवीन कत्रांट घेत आहेत.[१२] अशा अनेक माध्यमातून आदिवासी जमातीमध्ये नवीन परिवर्तन पाहावयास मिळत आहे. अशाप्रकारे आदिवासी जमातीच्या जीवनात नवीन परिवर्तन घडून येत असले तरी त्यांच्या नवीन समस्येची भर पडली आहे.

- **सारांश**

जागतिकीकरणाच्या युगात आदिवासी समाज आणि शहरी, ग्रामीण समुदाय यांच्यात जवळीकता वाढलेली आहे. त्यामुळेच आदिवासी समाजाच्या समाजिक परिस्थितीमध्ये बदल होत आहे. त्यामुळेच आदिवासींनी हिंदुच्या देव देवता, संस्कार, सण समारंभाचा स्विकार केला आहे ठाणे जिल्ह्यातील ठाकर जमात या आदिवासी समुदायावर हिंदूचा प्रभाव स्पष्टपणे प्रत्ययास येतो. १९८० पूर्वीची घरे आणि सद्यस्थितीतील ठाकरांची घरे यात कमालीचा फरक पडला आहे. ठाकरांनी सर्वच क्षेत्रात प्रगती केलेली आहे. त्याची सुरवात त्यांच्या घरापासूनच झालेली आहे.

**संदर्भसूची**

१) गारे,गोविंद.,(२००२),महाराष्ट्रातील आदिवासी जमाती, पुणे,कॉन्टिनेन्टल प्रकाशन, २३.
२) गारे,गोविंद.,(२००२),महाराष्ट्रातील आदिवासी जमाती, पुणे,कॉन्टिनेन्टल प्रकाशन, ३४.
३) मुटाटकर,रामचंद्र, (२००४),हाकारा (त्रैमासिक), (संपादक), पुणे, महाराष्ट्र मानवविज्ञान परिषद, औंध, ३५.
४) गारे,गोविंद.,(२००२),महाराष्ट्रातील आदिवासी जमाती,पुणे,कॉन्टिनेन्टल प्रकाशन, १५२.
५) रणसिंग,मोहन,(२००७),सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आदिवासी ठाकर, मुंबई, लोकवाङ्मय गृह, ६३.
६) गारे,गोविंद.,(२००२),महाराष्ट्रातील आदिवासी जमाती, पुणे,कॉन्टिनेन्टल प्रकाशन, ३२.
७) जाधव,सुधाकर,(२०१२),भारतातील आदिवासी समाज,औरंगाबाद,चिन्मय प्रकाशन, ३४
८) जाधव,सुधाकर,(२०१२),भारतातील आदिवासी समाज,औरंगाबाद, चिन्मय प्रकाशन, ३५
९) गारे,गोविंद.,(२००२),महाराष्ट्रातील आदिवासी जमाती,पुणे,कॉन्टिनेन्टल प्रकाशन, १६५
१०) मुटाटकर, रामचंद्र, (२००४), हाकारा (त्रैमासिक), (संपादक), पुणे, महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, औंध, १८.
११) रणसिंग,मोहन,(२००७),सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आदिवासी ठाकर,मुंबई,लोकवाङ्मय गृह, ६३.
१२) गारे,गोविंद,(२००२),महाराष्ट्रातील आदिवासी जमाती,पुणे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, १७२.



37